# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 18/08/2020 (मंगळवार)

(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावर मौजा वार्ड क्र. 12, मोवाड 12 येथे दिनांक 17/08/2020 चे 09.15 वा. ते 20.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नरायणसिंग श्रीरामसिंह राठोड, वय 58 वर्ष, रा. वार्ड क्रं 12, मोवाड यांचे राहते घराचे समोरील दाराचे कुलुप अज्ञात आरोपीने तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादीच्या घरातील लाकडी गोदरेज कपाट तोडुन कपाटातील किं. 40,000/–रु., नगदी 12,000/–रू. व मायक्रोमॅक्स कंपनीचा कन्वास टॅप कि. 1,000/–रू. असा एकुण कि. 53,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार शैलेश डोंगरदिवे 7057401598 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. बोरी :–अंतर्गत 2 कि.मि. मौजा बुटीबोरी शिवार मामा धाबा समोर येथे दिनांक 17/08/2020 चे 04:00 वा. दरम्यान रोशन अशोक चाचरकर(मृतक) वय 28 वर्ष, रा. बोरी हा पायदळ फिरत असता अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन त्यास धडक दिली. या अपघातात रोशन चाचरकर हा गंभीर जखमी होउन त्याचा जागीच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अशोक गणपत चाचरकर, वय 59 वर्ष, रा. भिसी ता. चिमुर जि. चंद्रपुर, ह. मु. जुनीवस्ती बोरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. शेख 8408806690 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. खापरखेडा – दिनांक 17/08/2020 चे 02.00 वा. ते 02.30 वा. चे सुमारास पो.स्टे. खापरखेडा हद्दीत फिर्यादी यांची वय 17 वर्षीय मुलगी, 15 वर्षीय लहान मुलगी व त्यांचा साळभाऊ यांची मुलगी वय 16 वर्ष या तिघींना आरोपी क्र. 1) स्वपनील गजभिये, वय 24 वर्ष व 2) संजय भिमटे, वय 25 वर्ष, दोन्ही रा. बिना संगम यांनी फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 363, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री निमगडे 8999917112 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर